श्री

गणपती

सामर्थ्य.

गणपती सामर्थ्य.

हें

पुस्तक

सिताराम रघुनाथ अधिकारी

यांनीं केलें



तें

खानापूर येथें "धनंजय" छापखान्यांत छापिलें.

सन १९०२.

[कायद्या प्रमाणें रजिस्टर करून सर्व हक्क मालकानें आपणाकडे ठेविले आहेत.]

किंमत ५ आणे.

महत्वाची

प्रस्तावना.

अलीकडे गणेशचतुर्थीच्या उत्सवाचा फैलाव आमच्या देशांत जारीनें सुरू झाला असून तो एक सर्व हिंदूंचा राष्ट्रीय उत्सवच होऊं पहात आहे हें सुचिन्ह होय. या उत्सवापासून गणपतीची भक्तीही अर्थात वाढत आहे व उत्सवाचे वेळीं होणारें पुराण, कीर्तन व व्याख्यानें यामुळें लोकांत धर्मश्रद्धा आणि ज्ञान हीं वाढत आहेत. अशावेळीं श्रीगजाननाचे भक्तिस प्रोत्साहन किंवा उत्तेजन देणें मोठें प्रासंगिक व हितप्रद होणार आहे, हें जाणून मी हें लहानसें पुस्तक स्वधर्मबंधुसेवार्थ लिहिलें आहे.

हल्लीं हिंदू उर्फ आर्यलोकांपुढें निर्णयाकरतां मुख्यत्वें चार पांच मुद्दे असून त्याबद्दल नव्या व जुन्या मतांच्या लोकांत गडबड सुरूं आहे. ते मुद्दे असेः—पुनर्विवाह, मूर्तीपूजा, श्राद्धें, देशपर्यटण व बालविवाहनिषेध. पैकीं शेवटील मुद्दा बहुतेकांशीं उभयपक्षांचे लोकांस मान्य असून रुढींत त्याचा अमल होत चालला आहे व जसजसा लोकांचा समज वाढेल, तसतसा बालविवाह व वृद्धविवाह बंद होत जातील यांत संषय नाहीं. देशपर्यटणाविषयीं जुन्यामतांच्या लोकांनीं जरी ओढून धरलेलें आहे तरी त्यांत अर्थ नाहीं. देशांतर्यादेशांत जर देशपर्यटणा-

पासून होणाऱ्या भ्रष्टाचाराहून जास्त भ्रष्टाचार चालू आहेत व देशपर्यटणापासून जर प्रत्यक्ष फायदे आहेत, तर जुन्यामतांच्या लोकांची टुरटुर कांहीं उपयोगीं नसून ती फार काळपर्यंत चालण्याचा संभव नाहीं. मात्र परदेशगमनकरणारांनीं होईल तितकें करून आपला धर्म व आचार-विचार परदेशांत सांभाळला पाहिजे हें खरें. तथापि परदेशगमन करणारांनीं परत आल्यावर प्रायश्चित करणें वाजवी आहे, कारण त्यामुळें धर्माच्या श्रेष्टत्वाचें वजन लोकांवर होणार आहे. श्राद्धें व मृतक्रिया यां विषयीं नव्या मताच्या लोकाचें, मुख्यत्वेंकरून आर्यसमाजिष्टांचें, कांहीं चालेल असें दिसत नाहीं, कारण आपणास पुण्य प्राप्त व्हावें अशा श्रद्धेनें सतत चालणारीं परोपकारांचीं कृत्यें जसें धर्मशाळा, विहीरी, धर्मादाय दवाखानें, अन्नसत्रें, इस्पितळें इ० जीं करण्यांत येतात, त्यांचें फळ जर फुकट जात असेल व तीं करणारांस जर मृत्यू नंतर तें मिळत नसेल तर जगांत तो एक अन्याय होईल व अशीं कृत्यें जगांत होणार नाहींत. परमेश्वर अन्याय कधींही करणार नाहीं, त्याला सद्हेतूचें फळ दिलेंच पाहिजे. तसेंच श्रद्धेनें परमेश्वरप्रित्यर्थ केलेली भक्ती जर अदृश्यपणें त्यास पोंचते, यज्ञद्वारें जर देवांस कांहीं तरी पोंचवितां येतें, आपल्या मृत्यूपत्रांत लिहिलेलें जर न्यायास अनुसरून पाहिजेत्यास आपल्या मृत्यूनंतरही पोंचवितां येतें, आणि प्राण जर अमर

आहे, तर त्याच्या प्रित्यर्थ कोणीही केलेल्या धर्माचें (परोपकारांचें किंवा सत्कृत्यांचें) फळ तो असेल तेथें त्याला प्राप्त झालें पाहिजे व हाच खरा न्याय होय हें उघड आहे. अशा प्रत्यक्ष प्रमाणाच्या संबंधांत धर्मशास्त्रांत असें आहे किंवा असें नाहीं ह्मणून अपसांत वादविवाद करीत बसणें मूर्खपणा होय. कोणत्याही रुढीस लोक अनुसरतात तेव्हां आपल्या फायद्याविषयीं खात्री झाल्याशिवाय उगीच कोणाच्या तरी नुसत्या अपमतलबी सांगण्यावरच ते तसें करतात असें मानणें शहाणपणाचें नाहीं. सबब ऐहिक व पारमार्थिक उभय न्यायास अनुसरून श्राद्धाचें फळ मृताचे प्राणास असेल तेथें मिळालेंच पाहिजे. तसेंच स्मारकांची चाल सर्व पृथ्वीभर असून श्राद्धें हीं एक प्रकारचीं स्मारकें-ही ह्मणण्यास हरकत नाहीं. शिवाय यथासांग केलेल्या मंत्र संस्कारांत जर कांहीं गुण असेल तर त्यामुळें मृताच्या प्राणास परलोकीं नियमीत ठिकाणीं पोंचण्याचा मार्ग सुखावह होत असावा यांत संषय नाहीं. हा विषय इतका बिकट व विस्तृत आहे कीं, त्यासंबंधीं येथें जास्त खुलाशानें लिहिणें विस्तारभयास्तव सोडून देणें जरूर आहे. आतां बाकी राहिले मूर्तिपूजा व पुनर्विवाह हे दोन मुद्दे. परमेश्वर जर सर्व-व्यापी, सर्व साक्ष व न्यायीं आहे तर श्रद्धामय भक्तीनें त्याची भावना एखादे प्रतिमेचे ठिकाणीं करून त्याचें अर्चन केल्यास भक्तास फलप्राप्ती देणें त्याला भाग आहे; कारण कोणत्याही ठिकाणीं हाच दत्त व सर्वस्वी कल्याण करणारा

असें समजून नीतिनें वागून भक्ती केल्यास चांगलें फळ मि-ळणें न्याय होय. शिवाय मोक्षप्राप्तीचें मुख्य साधन जें ध्यान किंवा तद्‌द्भुत समाधी त्यांस (ध्यानास) कांहीं तरी साकार वस्तू असेल तरच तें लौकर साध्य होण्याचा संभव आहे, व याप्रमाणें मूर्तिची भक्ती करणारे लोक सिद्धीच्या अत्यूच्च शिखरास पोंचल्याचीं शेंकडों उदाहरणें प्रत्यक्ष आहेत. शंकराचार्यासारख्यांनीं व मोठमोठ्या अध्यात्म ज्ञान्यांनींही मूर्तिपूजेची अवश्यकता प्रतिपादन केली आहे. शिवाय कोणत्याना कोणत्या तरी रीतीनें प्रतिमेची अ-र्चना पृथ्वीभर सर्व धर्मांच्या लोकांत आहेच. तेव्हां मूर्ति-पुजेंत कांहींच वावगें नाहीं. वेदावरूनही पहातां जगा-ची उत्पत्ती प्रकृती व पुरुष यांचेपासून झालेली असून हल्लीं आपण सर्व प्राण्यांत तदनुसार नर व मादी असा भेद प्रत्यक्ष पहात आहों, इतकेंच नाहीं पण जगांत दृश्य सृष्टींत जितकीं ह्मणून आनंद किंवा सौख्यें आहेत त्यांत नरमादीच्या संयोगाचे सुखाची उर्फ आनंदाची बरोबरी एकाच्यानेही होण्यासारखी नाहीं, मात्र तें क्षणिक असतें हें खरें; तथापि प्रकृती पुरुष एकाच ठिकाणीं असून त्यांच्याशीं प्राणाचें संमिलन होणें ह्मणजेच मोक्ष (अक्षयसुख किंवा पूर्णानंद) जर आहे, तर तेथें ह्मणजे सजोडस्थानीं प्राणानें विजोड जाण्यापेक्षां तत्जातीय ह्मणजे सजोड जाणेंच विशेष श्रेयस्कर असलें पाहिजे हें उघड आहे. प्रकृतींत ह्मणजे स्त्रियांत कमकुवत, काम,

अज्ञान (माया), चंचलत्व इ० दुर्गुण जास्त असल्यामुळें नरमादीच्या प्राणांच्या जोड्या बनण्यास निदान ज्ञानी ह्मणजे उंचवर्णीत तरी स्त्रियांचें पातिवृत्य रक्षण झालेंच पाहिजे, व कांहीं पातकामुळें नरमादीच्या प्राणांची जोडी फुटली असली तरी ती पुनः जुळण्याकरतां कांहीं नियमित प्रमाणानें उंचवर्णांत पुनर्विवाहाची (स्त्रियांच्या) बंदी असलीच पाहिजे, मात्र त्यांच्या पातिवृत्य रक्षणाचीं साधनें क्रूरपणाचीं नसलीं ह्मणजे झालें. शिवाय व्यभिचारामुळें प्रत्यक्ष नुकसान (शारिरीक वगैरे) होतें यावरूनही नरमादीच्या जोड्याच असाव्या असा परमेश्वरी संकेत आहे असें सिद्ध होतें.

वरील सर्व भारूड येथें लिहिण्याचें कारण हेंच कीं मूर्तिपुजेचें ह्मणजे मूर्तिवरील श्रद्धेचें महत्व जें या पुस्तकांत दर्शित केलें आहे तें किती वाजवी आहे त्याविषयीं लिहितानां त्यांच्या जोडीच्या दुसऱ्या वादग्रस्त प्रश्नाविषयीं ही येथें चार शब्द दाखल करावे लागले. खुद्द गणपतीविषयीं विचार करून पाहिल्यास तो गणांचा ह्मणजे सर्व गुणांचा (सद्गुणांचा) पती ह्मणजे स्वामी आहे. जोतिषांत देवगण, राक्षसगण व मनुष्यगण असे मनुष्यस्वभावाचे भेद सांगितले आहेत त्यांवरून ही गण ह्मणजे गुण असेंच सिद्ध होतें.

गणपतीच्या भक्तिमुळें सर्व सद्गुण व त्यांचें मुळ जी विद्या ती प्राप्त होऊन त्या सर्वांच्या प्राप्तिमुळेंच सर्व

सिद्धी ह्मणजे ऐहिक सर्व प्रकारचें सुखहि प्राप्त होतें हें प्रत्यक्ष दिसत आहे, ह्मणूनच त्यास सिद्धिदाता किंवा सिद्धिविनायक ह्मटलें असून त्याचे ठिकाणीं परमेश्वर-भावना केल्यास मोक्षाधिकारी होण्यासही कांहीं हरकत दिसत नाहीं. शिवाय "कलौ चंडि विनायकः" असें आमच्या अंतरज्ञानीसिद्ध पूर्वजांचें ह्मणणें आहे, यांत कांहींच गैर दिसत नाहीं; सध्यां असाच सुलभ मार्ग पाहिजे. एकंदरींत गणपतीभक्ति व उत्सव यांपासून ऐहिक व पारमार्थिक असे दोनहि प्रकारचे फायदे होणारे आहेत यांत संषय नाहीं.

या नाटकाचा कोणास प्रयोग अगर भाषांतर करणें असल्यास व त्याबद्दल कोणी परवानगी मागितल्यास ती कांहीं शर्तीवर दिली जाईल.

खानापूर येथील "**धनंजय**" छापखान्याचे मालक रा. रा. **दत्तात्रय गोविंद सडेकर** यांनीं केलेल्या मदती बद्दल मी फार आभारी आहे. शेवटीं या पुस्तकांत कांहीं गैरशिस्त किंवा चुका असल्यास त्यांबद्दल क्षमा मागून हा लेख पुरा करतों.

सिताराम रघुनाथ अधिकारी,

झाडेश्वरगेट-भडोच.

गणपती सामर्थ्य.

श्लोक. (वसंततिलका.)

जो आद्य दैवत गजानन तेजराशी ।
बाधूं न दे कधिंच संकट तो जराशी ॥
भावें तया नमुनि मागत सिद्धी मोदा ।
धांवे त्वरें निरसि संकट सर्व खेदा ॥ १ ॥

अंक १ ला.

प्रवेश १ ला.

स्थळ-रत्नागिरी, माधवरावाच्या घराचा दिवाणखाना
(माधवराव खुर्चीवर बसले आहेत व राधाबाई जवळच सत्रंजीवर बसून विडे करीत आहे.)

राधाबाई-गंगाबाई ह्मणत होत्या कीं, त्यांच्या नारायणाला सध्यां दहावं वर्ष चालू आहे आणि आपल्या बबीला सहावं आहे, तेव्हां वयाच्या मानानं कांहीं वावगं नाहीं. जोशीबुवा ह्मणत होते कीं उभयतांच्या टिपणावरून त्यांचं उत्तम जमतं.

माधवराव-पण इतक्या लहान वयांत लग्नें करणें चांगलें नाहीं. मुलें पुढ कशीं निघतील आणि कशीं नाहीं! सध्यां तर त्यांना नवरा ह्मणजे काय, बायको

ह्मणजे काय आणि लग्न ह्मणजे काय, कांहीं तरी समजतें आहे काय? शिवाय पुढें त्यांचे स्वभाव, वागणूक वगैरे कशी निघेल तें आतांच समजेल कसें?

राधाबा०—वा:, आमच्या सारख्या बायकांनाही हें थोडं बहुत कळतं, मग आपणास नाहीं का अनुमान करतां येणार? मला तर बाई वाटतं कीं, शास्त्रीबुवाचा मुलगा पुढं सर्व प्रकारें चांगलाच निघेल. असं मीच ह्मणतें असं नाहीं, सर्वांचे मुखांतून हेंच निघत आहे. (हास्यमुखानें) मग बाई "लहानपणी लग्न करूं नये" या आपल्या सभांतील प्रतिपादनाला धरून बसणं असेल तर इलाज नाहीं.

माधव०—तसें कांहीं नाहीं. पण मुलाचा विद्याभ्यास कसा होतो, व तो वागणुकीनें कसा निघतो, तें प्रत्यक्ष पहाणें चांगलें कीं नुसत्या अटकळीवरच अवलंबून रहाणें चांगलें?

रा०—त्या विषयीं कांहीं भ्यायला नको. गंगाबाई मला ह्मगत होत्या कीं, मुलाला पुढील विद्याभ्यासाच्या संबंधानं आपल्याच व्यवस्थेंत व देखरेखीखालीं ठेवायचं. आपण पुण्यास किंवा मुंबईस त्याला ठेवूं ह्मणजे झालं. तशांत आपली बदली पुण्यास होण्याचा संभव आहे ह्मणून ह्मणत होतां तसं झालं तर मग काय दुधांत साखर! (विडा माधवरावापुढें करते)

मा०—(विडा घेऊन तोंडांत घालून) शास्त्रीबुवाचें व-

राणें चांगलें आहे व तेही विद्वान व स्वभावानें फार चांगले आहेत, एकदां बोलले तर फिरावयाचे नाहींत. मग इतकी घाई ती कशाला? सध्यां नुसती त्यांची अनुकुळता घेऊन ठेऊं ह्मणजे झालें. शिवाय त्यांचे मुलाहून दुसरा चांगला मुलगा पुढें आढळणार नाहींच असें कशावरून!

रा०-कसंही असो, लहान मुलांचे लग्नांत जस सोहाळे कौतुकानें करतां येतात तसं कांहीं मोठेपणीं होत नाहीं. शिवाय मुलीस लहानपणापासून सासरचें वळण व सवय पडली तर किती चांगलं हें मी सांगितलं पाहिजे असं नाहीं.

मा०-पण या सर्व गोष्टी माझ्या ह्मणण्यापेक्षां कमीच महत्वाच्या आहेत असें मी समजतों. शिवाय ब्रह्मचर्य होईल तितकें जास्त काळ पर्यंत रक्षण होणें सर्व प्रकारें हितकर व अत्यावश्यक असल्यामुळें अशा अल्प वयांत लग्नें होणें अगदीं अयोग्य आहे.

रा०-बरं बाई, मनांतूनच नाहीं मग उपयोग काय? मी आपली वेडी, केव्हांपासून उगीच बडबडलें!! (रागानें उठून जाऊं लागते)

मा०-(उठून तिचा हात धरून जवळ घेतो व चुंबन घेवून) हें काय बरें उगीच्या उगीच रागावणें? मी गैर कां सांगतों आहे? पुढें भलता सलताच एखादा कांहीं परिणाम झाला ह्मणजे कसें होईल?

रा०--(मांडीवर बसून व गळ्यांत हात घालून) पण प्राक्तन कोणाच्यानें तरी फिरलें आहे कां? मला वाटतें शुभकार्याला किं नाहीं अगदीं उशीर लावूं नये.

मा०-- बरें आहे. तुझ्यापुढें--ह्मणजे बायकांपुढें--गृहकृत्यांत पुरुषांचें कोठें चालणार आहे! आमच्या स्त्रियांना मोकळीक उर्फ मान नाहीं ह्मणणारांना हें कोठें दिसतें आहे!! अस्तु. तुझ्या इच्छेप्रमाणें सर्व होईल. आतां उठावें, आफिसांत जाण्याला विलंब होतो आहे.

प्रवेश २ रा.

स्थळ--शास्त्रीबुवांच्या घरांतील निजावयाची खोली.

शंकरशास्त्री--तूं सांगतेस खरें, पण मला नाहीं वाटत कीं माधराव आतांच लग्न करण्याला कबूल होतील. कारण परवां नुकतेंच त्यांचें व्याख्यान याच विषयावर झालें त्यावेळीं लहानपणीं लग्नें केल्यापासून किती नुकसानें आहेत तें त्यानीं किती तरी चांगल्या रितीनें प्रतिपादन केलें! कसेंही असो, माझेंही मत लहानपणी लग्नें करण्याच्या विरुद्ध आहे.

गंगाबाई--पण कालच राधाबाई ह्मणत होत्या कीं माधवरावजी कबूल आहेत व ते आपल्या जवळ याविषयीं बोलणार आहेत. दुसरं कांहीं नाहीं, पण असं ठिकाण व अशी नक्षत्रासारखी मुलगी शोधून मिळावयाचीं नाहींत.

शंकर०-तें खरें, पण माधवराव मला नाहीं वाटत या कामीं अनुकूल असतील. शिवाय मुलगी सुरेख असली तरी पुढें कशी निघेल तें आतांच कां कोणाला समजणार आहे! आणि मुलाचें लग्न लौकर करून त्याचे पायांत इतक्यांतच संसाराची बिडी आडकविणें ह्मणजे त्याच्या विद्याभ्यासांत व्यत्यय आणण्यासारखें आहे.

गंगा०-हें कायबाई आपलं ह्मणणं असं! विद्याभ्यासांत तो कसला व्यत्यय येणार! उलट बायकोचं संगोपन केलं पाहिजे व विद्या शिकल्या शिवाय तें करतां येणार नाहीं हें समजून विद्या संपादन करण्याकडे जास्त श्रम मुलगा करणार आहे. शिवाय स्वतःची बायको असल्यावर मुलगे बाहेर छंदीही होत नाहींत. मुलाच्या विद्याभ्यासाची सर्व व्यवस्था त्यांच्याकडूनच होणार आहे. राधाबाई ह्मणत होत्या कीं, माधवरावजी सध्यां ओव्हरसियर आहेत, पण त्यांस लौकरच बहडती मिळून त्यांची बदली सबइंजिनीयरचे जागेवर पुण्यास होणार आहे. मुलीस माहेरचं चांगलं वळण आहे, तेव्हां ती पुढें वाईट निघण्याविषयीं ही काळजी नको.

शं०-मग पुण्यास तर मुलाच्या विद्येविषयीं फारच चांगलें जमेल. मात्र लग्नाचा खर्च त्यांचे तोलाचा आपणाकडून कसा झेंपेल हा एक विचार आहे.

गं०-त्याविषयीं ही काळजी नको. त्या उभयतांसही आपला नारायण इतका पसंत पडला आहे कीं, तीं कोणत्याहीप्रकारें तक्रार करणार नाहींत. इतकेंच नाहीं, जरूर तर त्यांचेकडून द्रव्याचे संबंधांत आपणास मदतही होईल. मुलीबद्दल तर कांहीं घेण्याचें नावच नको, कीं नको मुलीवर आपलेकडून कांहीं फारसे दागीनें घालावयास; हल्लींच कांहीं तिचेवर कमी नाहींत!

शं०-बरें तर, माधवरावानीं गोष्ट काढल्यास मी सर्व खुलासा करून घेईन व जमल्यास सर्व कांहीं ठरवीन.

गं०-हो खरंच बाई, मी एक गोष्ट सांगण्यास अगदींच विसरलें होतें. राधाबाई आणखीही अशा ह्मणाल्या कीं आपली संमत्ती असल्यास लौकरच पुढील वैशाखमासीं पुण्यास जाण्यापूर्वीं कार्य उरकून घेण्याचा त्यांचा विचार आहे.

शं०-बरें आहे तर पुढील महिन्यांतच तिथीनिश्चय ठरविण्याचा विचार करूं. या करतां उद्यां संध्याकाळीं मी मुद्दाम माधवरावांकडे जाऊन त्यांस भेटतों.

प्रवेश २ रा-

स्थळ-नाटकवाल्यांची जागा.

म्यानेजर-(रामचंद्रपंतास) पण मुलगा सुरेख असून चलाख आहे. आपल्याला तो फारच उपयोगी पडेल

मात्र तो आपल्या हातीं लागण्याची कांहीं चांगली युक्ती निघाली पाहिजे.

रामचंद्र०—तें काम माझ्याकडे लागलें. मी त्याला तो येतो तेव्हां मिठाई देऊन बहुतेक अनुकूल केला आहे. त्याचा आई बाप इकडे अगदीं येऊं देत नाहींत तो चोरून येत असतो असें ह्मणत होता.

शिवरामपंत—पण इतक्यानें भागणार नाहीं, नुसत्या मिठाईनेंच काम होणार नाहीं. त्याला विद्येचा छंद फार आहे. इकडे आला तरी त्याचें सर्व लक्ष बुकाकडे असतें व तोंडानें पाठ करितच असतो.

म्या०—अं: त्यांत काय आहे; मात्र आपलें बिऱ्हाड येथून उचलून एखाद्या दूरच्या शहरीं न्यावें लागेल. मंडळींत राहूनही विद्याभ्यास होईल.

राम०—हो आणि त्याला कांहीं दिवस छपवूनही ठेवावा लागेल-

शि०--शिवाय आपल्या इकडे त्याचें नावही बदललें पाहिजे ह्मणजे त्याला शोधणारांस कांहींच मागमूस लागणार नाहीं.

म्या०—त्याचें नाव आपण गोविंद ठेवूं व बरेचदिवस त्यास स्टेजवर आणावयाचा नाहीं.

(इतक्यांत नारायण येतो.)

म्या०—नारायणराव, असे जवळ बसा (आपल्या

शेजारीं बसवितो.) कांबरं, आतां कसें येऊं दिलें तुह्माला आईनें इकडे?

ना०—आमच्या शाळेंतील एका मुलाकडे अभ्यास करण्यास नेहमी प्रमाणे गेलों होतों तो परत जातांना मनांत आलें कीं इकडे येऊन जावें.

राम०—तरीपण आपली आमचेवर इतकी मेहेरबानी आहेकीं आपल्याला इकडे यावेंसें वाटतें!

नारा०—(हसून) इकडे क्षणभर येऊन बसलें ह्मणजे गाणें, बजावणें वगैरे पहाण्यास व ऐकण्यास सांपडतें. शिवाय आपलें फिरणें दूर दूर देशीं होत असल्यामुळें मंडळींतील त्या संबंधाचीं बोलणीं ऐकण्यासही बरें वाटतें. मला वाटतें दूरदूरचे देश पहाण्यांत मोठी मौज आहे.

शि०—वा: हें काय विचारावें? आतां तर लौकरच आह्माला बऱ्याच दूरच्या देशीं जावयाचें आहे व त्या देशांत जशी खाण्यापिण्याची व मौज पहाण्याची सोय आहे तशी कोठेंच नसेल.

म्या०—पण तें नारायणरावास काय उपयोग! ते आहेत आईबापांच्या कैदेंत!!

ना०—आणि शिवाय माझें विद्येच्या संबंधात मोठेंच नुकसान होणार.

म्या०—अं:. त्याबद्दल तर मी सर्व व्यवस्था अशी करीन कीं उलट तुमचा जास्त फायदाच होईल.

राम०—अहो, जास्त कांहीं व्यवस्था करण्याची जरूर आहे असें नाहीं. आपले विनायकराव म्याट्री-क्युलेटेड आहेत, तेव्हां घरच्याघरीं उत्तम शिक्षण.

ना०—पण येत्या द्वादशीला माझें लग्न आहे.

शि०—मग त्यांत काय आहे! लग्न होऊन जाऊंद्या. आह्मी गेलों तरी एक मनुष्य तुमचे करितां ठेऊन जाऊं, त्याचे बरोबर तुह्मी यावें ह्मणजे झालें.

ना०--पण चोरून पळून गेलों तरी घरचीं मनुष्यें तपास करून पकडतील मग कसें होईल?

म्या०—त्याविषयीं तुह्मांला काळजी नको; सर्व व्यवस्था यथायोग्य केली जाईल. अहो, आमच्या नाटकी मंडळीपुढें कोणाची मती चालणार आहे!

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

स्थळ—पुणें येथील माधवरावाचें घर. (माधवराव खुर्चीवर बसून पुढील टेबलावर कांहीं लिहीत आहे.)

राधाबाई—(चहाचीं भांडीं टेबलावर ठेवते व उभी राहते.) मग अद्याप कांहीं पत्ता लागला कीं नाहीं?

माधव०—विठ्ठलपंताकडून आजच कचेरींत पत्र आलें. त्यांत त्यांनीं लिहिलें आहे कीं, नाटकवाले आकोल्यास आहेत. त्यांस पुष्कळ आशादाखवूनही पाहिली व शोधही पुष्कळ केला पण कांहीं पत्ता लागत

नाहीं सबब ते आज तेथून परत निघणार आहेत. पोलीसमार्फतही पुष्कळ खटपट करविली पण अद्याप कांहीं निष्पन्न झालें नाहीं. तो नाहिंसा झाल्याला आज जवळजवळ सहा महिनें होत आले आतां मला वाटतें जास्त प्रयत्न करण्यांत अर्थ नाहीं.

राधाबा०–(डोळे पुशीत) मग आतां माझ्या बबीचे नशिबीं काय असेल तें खरें!

(इतक्यांत बबी प्रवेश करिते)

बबी–कायग आई, काय झालं? तूं अशी रडतेस देशीं होत कां?

रा०–(तिला उंचलून पोटाशीं धरते) तू-ला-कांय-सां-गू-बाई, देवाची मर्जी काय अ-सेल तीख-री. (मा० धवरावास) बबीच्या सासऱ्याकडून कांहीं पत्रबित्र तरी आलं आहे कां?

मा०–नाहीं, परवां आलें होतें तितकेंच. त्यांचें घर जळून जर सर्वप्रकारें नुकसान झालें आहे तर त्यांच्या मागण्याप्रमाणें आपण आपल्या मुलीकरतां तरी त्यांना कांहीं मदत केलीच पाहिजे. माझे मनांत त्यांस पन्नास रुपये पाठवून देण्याचें आहे.

रा०–खरंचबाई, हा त्यांच्यावर मोठा प्रसंगच आहे. आपण अशावेळीं त्यांनां मदत केलीच पाहिजे.

मा०–इतक्याकरितांच मी लहानपणीं लग्न करण्याचें नाहीं म्हणत होतों, पण तूं ऐकलें नाहींस. आतां बरें

तर बरें, नाहीं तर आपण आपल्या एकुलत्या एका मुलीचें केवढें नुकसान केलें आहे बरें!

रा०—नको मेले दुःखावर डाग आतां! झालं पुनः कां परत येतं? (पुनः डोळे पाण्यानें भरून आल्यामुळें ते पुसते.)

मा०—बोललों ह्मणून काय झालें. ओघास आलें तें बोललों ह्मणून कां असें दुःख करावयाचें! असें वारंवार दुःख केल्यानें आपल्याच ना जिवाला दुःख होणार! हें कांहीं शहाणपणाचें काम नव्हे.

बबी—बाबा, आई कां रडते? माझा नवरा मुंबईस गेला ह्मणून? अन्नपूर्णाकाकीनी मला सांगितलं कीं माझा नवरा मला मिठाई आणायला गेला आहे. मी त्यांतून आईला आणि तुह्माला पण देईन, पण मी जास्ती घेईन हां.

प्रवेश ३ रा.

(शंकरशास्त्री कपाळाला हात लावून विचार करीत बसले आहेत इतक्यांत गंगाबाई येते)

गंगाबाई—नारायणाच्या सासऱ्याकडून कांहीं पत्र वगैरे नाहीं आलं ना?

शं०—नाहीं मी दोन पत्रें पाठविलीं पण एकाचेंही उत्तर नाहीं; त्यामुळें गेल्या सुमारें एक महिन्यांत त्यांचेकडील कांहींच वर्तमान कळलें नाहीं. मग वारंवार त्यांस मदत देण्याविषयीं त्रास देतों ह्मणून राग

घेऊन पाठवीत नाहींत कीं त्यांना इंदुरास मोठी जागा मिळाली असून तिकडे ते निघून गेले तें कांहीं कळत नाहीं.

गं०—कदाचित इंदुरास जाण्याच्या गडबडींत त्यांस इकडे लिहिण्यास साधलें नसेल व निघून गेले असल्यामुळं त्यांस आपलीं पत्रं पोंचलीं नसतील असं मला वाटतं. मदत मागण्यामुळं त्रासून उत्तरच पाठविणार नाहींत असं होईलसं दिसत नाहीं. त्यांचे मुलीला आमचेकडे आल्याशिवाय गत्यंतर नाहीं हें ते जाणत नसतील असं नाहीं. मग बाई कुणाला ठाऊक, पत्र नसण्याचं काय कारण आहे तें! मेलं कर्म फिरलं म्हणजे तें चोहोंकडून दुःख देतं. माझा बाबा आ-तां-कु-ठं असेल! (रडूं लागते.)

शं०—असें काय करावें. रडून का काय होतें, आणि वारंवार रडून रडायचं तरी किती! सध्यां आपली व त्याची ग्रहदशा वाईट आहे व त्यामुळें असें झालें आहे. पण तीच पुढें फिरल्यावर सर्व सुरळीत होईल. दुःखाचे व संकटाचे वेळीं धैर्य सोडणें चांगलें नाहीं. असो, पण माझे मनांत कांहीं विचार आला आहे, तर त्याबद्दल तुला काय वाटतें तें सांग पाहूं.

गं०—(डोळे पुसून) मला तर मेलं कांहीं सुचत नाहींसं झालं आहे. पण मला विचारण्यासारखी अशी कोणती गोष्ट आहे?

शं०—मला आतां अशा स्थितींत राहणें नकोसें झालें आहे. मनाला अगदीं औदासिन्य प्राप्त झालें आहे. ह्मणून असें वाटतें कीं, आपल्या कृष्णरावास मुंबईस पत्र पाठवावें. कसा झाला तरी तो चुलत बंधू आहे. त्याच्या आश्रयास आपण मुंबईसच जाऊन रहावें. तेथें दोन पैशांची चांगली प्राप्ती होईल आणि त्यांच्या सहवासानें आपण आपलें दुःखही कांहींसें विसरूं.

गं०—हो, ही युक्ति चांगली आहे. रुख्माबाई ही स्वभावानीं फार चांगल्या आहेत. मला वाटतं तेथें आपलं चांगलं चालेल. शिवाय मोठं शहरही पाहण्यांत येईल. मला तर बाई तें पाहण्याची केव्हांपासून इच्छा झाली आहे ! गुदस्तां रुख्माबाई इकडे आल्या होत्या आणि त्यानीं तेथील गोष्टी सांगितल्या तेव्हांपासून हें माझ्या मनांत घोळत आहे, पण आपणास त्याबद्दल काय वाटेल कोण जाणं असं समजून आपल्याजवळ मी बोललें नाहीं.

शं०—तर मग मी आज कृष्णरावास पत्र लिहितों आणि जबाब त्वरित पाठविण्यास कळवितों.

प्रवेश २ रा

स्थळ—मुंबई येथील कृष्णरावाचें बिऱ्हाड.

कृष्ण०—हें पाहिलें कां शंकररावाकडून पत्र आलें आहे.

रुख्माबाई—काय लिहिलं आहे पत्रांत?

कृ०--त्यांत त्यांनीं लिहिलें आहे कीं, त्यांचें मन घर जळल्यामुळें व मुलगा कोणीकडे निघून गेल्यामुळें अगदीं उदासीन झालें आहे. त्यांच्या मनांतून इकडे येऊन रहावें असें आहे, पण इकडे येण्यासही सध्यां त्यांचेजवळ पैसे नाहींत असी त्यांची स्थिती झाली आहे.

रु०-ते कां कुणी परके आहेत! अशा वेळीं मला वाटतं त्यांना आपण मदत केली पाहिजे. शास्त्रीबुवा पुराण उत्तम सांगतात व त्यांचं इथें चांगलं चालेल असं वाटतं' तूर्त तीं उभयतां रहातील आपल्या येथेंच, मग त्यांचं चांगलं चालूं लागलं ह्मणजे रहातील पाहिजे तर निराळीं भाड्यानं जागा घेऊन.

कृ०-बरें तर, मी त्यांनां पंधरा रुपये पाठवून देऊन तावडतोब निघून येण्याविषयीं लिहीतों. तसेंच आपल्या सरस्वतीला एक महिन्याकरतां इकडे पाठविण्याविषयीं विश्वनाथपंतानांही लिहावें असें वाटतें.

रु०-पहाबाई; पण तरुणांनां आपल्या बायकानां आपल्यापासून दूर राहूं देणं फारसं आवडत नाहीं, तेव्हां ते तिला पाठवितील किंवा नांहीं याचा मला संषय वाटतो.

कृ०—पण पोरीला वर्ष दोन वर्षांनीं तरी थोडी विश्रांती मिळाली पाहिजे कीं नाहीं? माहेर ह्मणजे त्यांचें विश्रांतीस्थान.

रु०–तसें कांहीं नाहीं. मागले खेपेस सरस्वती इकडे आली होती तेव्हां ह्मणत होती कीं तिला आपल्याला जरी भेटावसं वाटतं तरी नवऱ्याशिवाय चैन पडत नाहीं. तिनी मला दोन तीन वेळां विश्वनाथाला पत्र पाठवून बोलविण्याकरतां आपणांस सांगावं ह्मणून सांगितलं होतं, पण त्यांनां येण्यास रजा मिळणार नाहीं ह्मणून तीच ह्मणत असे ह्मणून मी आपल्याजवळ बोललें नाहीं.

कृ०–पहा, समजुतींत आल्यावर परस्परांच्या मतानीं व पसंतीनीं लग्नें केल्याचा हा फायदा आहे. देव करो आणि या गिरजा विश्वनाथाच्या जोड्यांत परस्पर प्रेम व सुखवृद्धी होत जावो !

रु०–तिनं गेल्याखेपेस तिच्या पत्रांत लिहिल्याप्रमाणं अभ्यास चालविला असेल तर आतां ती बरीच शिकली असेल.

कृ०–तिचा नवरा चांगला विद्वान आहे व तो स्वतःच शिकवीत असतो असें ती लिहिते. तेव्हां प्रीतीचें ह्मणजे अगत्याचें शिकविणें असल्यावर अभ्यास कां वाढणार नाहीं! स्त्रियांना विद्येमुळें शहाणपण येतें, त्या योगें त्या आपलें गृहराज्य उत्तमप्रकारें चालवितात आणि त्या नीतिमान होतात; शिवाय त्यांचे हातीं लहान मुलांचें संगोपन असल्यामुळें देशांत थोर व पराक्रमी मनुष्यें निपजतात व देश सुखी होतो इतका स्त्रीशिक्ष-

णाचा मोठा प्रभाव आहे, पण तें स्त्रीशिक्षण रीतशीर मात्र असलें पाहिजे आणि स्त्रियांस मोकळीकही बाजवी तितकीच असली पाहिजे. विश्वनाथही आपला अभ्यास वाढवीत आहे असेंही तिनें लिहिलें आहे, त्यावरून तो पुढें वाढत जाईल असें वाटतें. असो, तर आतां सध्याच मी कांहीं त्याला सरस्वतीस पाठविण्याविषयीं लिहित नाहीं.

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

स्थळ–खंडवा येथील धर्मशाळेची ओटी.

माधवराव– (खुर्चीवर बसले असतां) ऐकलें कां, उद्यां पहांटेस येथून निघण्या करितां गाड्या येतील. इकडे बैलाच्या गाड्या किंवा घोडीं यांशिवाय जाण्याचें दुसरें चांगलें कांहीं साधन नाहीं. रस्ताही जंगलाचाच व डोंगरांतून आहे.

राधाबाई–(आंतील बाजूस कापडाच्या घड्या घालीत असतां) पण इकडे रेलवे होणार आहेनां? तें काम चालू आहे असं आपण ह्मणत होतां असं मला आठवतं.

माधव०–हो तें पुरेंहि होत आलें आहे, पण त्याचा आपणास उपयोग काय? तें पुरें होईतों पर्यंत आ-

पणास थोडेंच येथें राहून चालणार आहे. आपल्याला बैलगाड्यांतूनच गेलें पाहिजे.

(इतक्यांत समोर एक साधू येऊन उभा राहतो आणि ह्मणतो)

श्लोक (वसंत०)

जो आद्य दैवत गजानन तेजराशी ।
बाधूं न दे कधिच संकट तो जराशी ॥
भावें तया नमुनि मागत सिद्धिमोदा ।
धांवे त्वरें निरसि संकट सर्व खेदा ॥

माध०–(साधूच्या सतेज देखाव्याकडे पाहून आश्चर्य वाटून उठून उभा रहातो) महाराज, कृपा करून वर यावें. (तो आल्यावर त्यास खुर्चीवर बसण्यास सांगून) स्वामीमहाराज, आपल्याला कांहीं विचारावेंसें वाटतें.

साधू–काय विचारावयाचें असेल तें खुशाल विचारावें.

मा०–आपलें मूळचें रहाणें दक्षणचें असावें असें वाटतें.

सा०–सर्व ठिकाणचें. हेंच कां विचारावयाचें होतें? असल्या गोष्टी विचारण्यापासून आपणास फायदा काय?

मा०–(हात जोडून) हें विचारल्याबद्दल क्षमा व्हावी. मला मूळ विचारावयाचें तें हें नव्हें.

सा०–मग तें काय तें सांगावें.

मा०--आपण बोललेल्या श्लोकांत गजानन महाराजा जवळ जें मागणें आहे तें कोणा करतां?

सा०--वाः, उत्तम प्रश्न केला! तें मागें दुःखी-जना करतां. दुःखी लोकांचें दुःख निरसन करावें हें माझ्या कर्तव्यापैकीं एक असें मी समजतों.

सा०—सध्यां हा देश तर बहुधा सर्व दुःखी जनानीच भरला आहे.

सा०—त्या सर्वांचें दुःख जावें अशीच माझी इच्छा व प्रयत्न आहेत.

(हा सर्व संवाद ऐकल्यावरून राधाबाई बबीसह आंतून बाहेर येते व स्वामीस नमस्कार करते.)

सा०—अखंड सौभाग्यवती भव.

रा०—(मुलीस) बबी, महाराजांस नमस्कार कर. (ती तसें करते.)

सा०—अखंड सौभाग्यवती भव.

रा०—(हात जोडून) महाराज, आपण अशिर्वाद दिलात, पण हिचा नवरा कोणीकडे गेला आहे त्याचा ठिकाण नाहीं.

सा०—(हास्यमुखानें) चिंता नाहीं माझा अशिर्वाद अन्यथा होणार नाहीं. मुलीकडून गणपतीचें चतुर्थीचें व्रत करवावें. आठवर्षांत तिचा नवरा भेटेल यांत संषय नाहीं.

रा०—महाराज, आपण आह्मांला परमेश्वरच भेटलांत. आह्मीं उभयतां व मुलगी अशीं सर्वच व्रताचरण करूं.

सा०–मग फारच चागलें. गजानन या युगांत प्रत्यक्ष परमेश्वरच आहे. " कलौचंडी विनायकः " नीतिमान भाताचें तो फळ देतोच.

मा०–(स्वामीस) स्वयंपाक तयार आहे व वेळही माध्यांनीचा होत आला आहे, आपण कांहीं ग्रहण केल्यास मोठे उपकार होतील.

सा०-मी दुसऱ्याच्या हातचें खात नाहीं. कांहीं भिक्षा देण्याची इच्छा असल्यास घेईन. (माधवराव खिशांतील पाकीट काढून पांच रुपये देऊं लागतो) छे, छे, मी द्रव्याची भिक्षा घेत नाहीं. फक्त डाळ, तांदूळ किंवा पीठ मात्र कोणी दिल्यास घेतों.

(राधाबाई लौकर लौकर आंतून तांदूळ, डाळ व कणीक सुपांत घेऊन येते. पण त्यांपैकीं डाळ व तांदूळ मात्र एकाच ठिकाणीं स्वामी पदरांत ओतून घेतात आणि उठतात.)

मा०–(नमस्कार करून व हात जोडून) महाराज, दीनावर कृपा असों द्यावी.

सा०–गजाननाची. (जातात.)

मा०–असा साधू मी कधींच पाहिला नव्हता. रूप तरी किती तेजस्वी. किती तरी निरिच्छ आणि शब्दांत अर्थगांभीर्य ही किती !

रा०–मला वाटतं ते प्रत्यक्ष जणू गणपतीच आले होते व आपलं नशीब चांगलं ह्मणून दर्शन झालं.

मा०–हा नवीन नोकरीवर जात असतां शुभशकुनच ह्मणावयाचा !

रा०–असंच होवो व माझ्या लाडकीचा (खालीं वाकून व हनुवटी धरून वडीचा मुका घेते) नवराही लौकर भेटो.

प्रवेश २ रा.

स्थळ—महू येथील धर्मशाळा.

हुसेनखान–क्यंजी, अमीरखान, बजारमें जाके कुछ शाकबिक ले आवोंगे ? जे पैसा लेव. (पैसे देतो) आजके रोज आपून याहांही ठेरेंगे और कल यहांसे निकलेंगे तो आपना सब थाक निकल जायगा. अब इंदोर तो बोहोत नझदीक है.

अमीर०–आछा, हं अभी देखो शाक और बाकी जो चहियेसो सब चीज ले आतें है. और एक घंटेके अंदर खानाभी पकालेतें है. (जातो)

हु०–(धर्मशाळेच्या जागेच्या शेवटीं एक मनुष्य नुसत्या अंगवस्त्रावर पडलेला पाहून त्याचे जवळ जातो) क्यं भाई ? काहांसें आतहो और किधर जाओगे ?

मनुष्य--(उठून बसून) हं बडोदेके तरफसें आये है और इंदोरकूं जाना चहातेंहै.

हु०–तुमारे पासतो कुछहै नहीं. नहीं लोटाके रस्सी. के नही बिछाने कूं भिकुछ. तो इतने दूर कैसे आये ? तुमारे संग दुसरा कौन है.

म०–मेरेपास कुछ नही. नही मेरेसंग दुसरा कोईभी.

एक आंगोठीथी सो बेचके आये. बोहोत तखलीप उठाना पडी. लेकीन हाल सबपैसा खरच होजानेके सबबसे आज दोरोज कुछ खायानहीं. देखना आगे क्या होताहै. भगवतकी मर्जी!

हु०—तुता भाई जवान लडका है. खुपसुरतभी है. तेरे माबाप कांहा है, रेहेनेवाला काहांका, और इंदोरकूं क्यौं जाते हो?

म०—हां, मेरी उमरहाल अठरा उनवीस बरसकी होगी मै दखनका रेहेने वाला हूं, मेरे, माबापकूं छोटेपनमेंही मै गुमाया. इंदोरकूं कुछ धंदा मिलानेंके वासते जाताहूं. लेकीन कैसा होगा कोन जाने! (डोळे पाण्यानें भरून येतात ते पुसतो.)

हु०—लडके, रोना नहीं. आलाताला सबका माबाप है. डरना नही. हंकूंभी इंदोर जानाहै. एक महिनेकी छुटीलेके घरकूं गयेथे; अब नोकरीपर हझर होनेके लिये जाताहुं. हमारे संग चलना. हमारे रावसाब बोहोत अछे सभावके हैं, ओ बडे इंजनर है, दखनीहै, हं उनकूं कहेंगें, और ओ तमकूं कहींभी लगा देयेंगे. (थोडा विचार करून) लेकीन बडोदेमे नोकरी मिलानेका तजवीज करनेका छोडके इंदोरकूं क्यौं चले हो?

मुलगा—हं बडोदेमें एक नाटकमेथे, और कोई इंग्रजी परिक्षा देनेकेलिये उनलोगने हंकूं बंबई जाने नहीं दिया वास्ते उनके साथ छडके हं चल दिया,

और इंदोर रीयाशतका बडा शहर है ऐसा आनके इधर आया.

हु०–अछा, फिकर मत करो. (खिशांतून चार आणे काढून) जे पैसा लेव और बजारमेसें कुछ लेआके खाओ. कल आपून यहांसे निकलेंगे. तूं अंग्रजीभी पढे है सो बोहोत ठीक है.

मु०–साहेब, आपकी बाहोत मेहेरबानी हुवी.

प्रवेश ३ रा.

स्थळ—माधवराव इंजिनीयरचे घर.

हुसेन०–(मुलास) तूं इधरही ठेरना, हं अंदर जाके रावसाबकूं मिळते है, और पिछे तूंकू बुला लेयेंगे. (अमीरखानास) तुम आपने मकानपर जाके खाना बनानेकी तजवीज करना. जे चावी लेव. (चावी देतो)

मा०–(हुसेनखानास पाहून) आओ जमादार, कैसे अछे हो?

हु०–(लवून सलाम करून) जी सरकार, आछा है.

माध०–बालबचेभी सब अछे है! उनकूं साथ लायेहो के नहीं?

हु०–नहीं सरकार, उनकूं नहीं लाये. घरमे तबियेत अछी नहींथी करके नहीं लाय, पिछे बुला लेयेंगे.

माध०–नोकरीपर कबसें आना चाहाते हो?

हु०—कलसें आऊंगा रावसाहाब. लेकीन सरकारके पास एक अरज है.

माध०—क्या है बोलो.

हु०—मेरे साथ एक दखनी आठारा उंनवीस बरसका लडका है. बिचारा बोहोत दुःखी है, कोईका आस्त्रा नहीं, कोई धंदेके वासते फिरता है. लडका हुशियार है ओर स्वभावसेभी बोहोत अछा देख पडता है. आप कुछ आस्त्रा देओंगे ऐसा समझके हं उसकूं साथ लायां है.

माध०—ओ कहां है? उसकूं ले आवना उपर.

हु०—(जाऊन त्याला घेऊन येतो) जे आया सरकार.

(मुलगा खालीं वांकून नमस्कार करतो)

माध०—कोठले राहणार तुह्मी आणि तुमची ज्ञाती कोण?

मु०—मी ब्राह्मण आहे. सातारचा रहाणार.

माध०—तुमचें नाव काय व आईबाप आहेत किंवा नाहींत?

मु०—आईबाप नाहींत. माझें नांव गोविंद.

माध०—उपनांव?

मु०—जोगळेकर.

माध०—कांहीं अभ्यास झाला आहे काय?

मु०—होय महाराज, मराठी सहाव्या इयत्तेपर्यंत व इंग्रजी म्याट्रीक्यूलेशनपर्यंत.

माध०-बरें. आतां मला जास्त बोलण्याला आव-काश नांहीं. मात्र दुसरी नोकरीची कांहीं व्यवस्था होईतोंपर्यंत तुह्मी आमच्यायेथेंच रहावें व आमचें खासगी लिहिण्याचें वगैरे काम करावें. पुढें तुमची हुशारी व वागणूक वगैरे पाहून कायतें करतां येईल. (हुसेन खानास) तुम जानां जमादार आत्र.

हु०-सरकार, हंकू और क्या हुकूम है?

माध०-कलसें नोकरीपर आवना, और कुछ नहीं.

हु०-(गोविंदास) भाई, आछा रितसे रहोगे तो कुछ कम नहीं पडेगा, समजे? (जाऊंलागतो)

गो०-अनुभव बिना मूसें केहेना व्यर्थ है.

मा०-(मोठ्यानें) कासी. कासी.

का०-जी साहेब. (येते)

मा०-यांना खालीं घेऊन जा व त्यांच्या स्नानाची वगैरे तजवीज कर.

अंक ४ था.

प्रवेश १ ला

स्थळ--माधवरावाचें घर.

माधव०-गोविंदाचा स्वभाव व हुशारी वाखाण-ण्यासारखीं आहेत असें मला वाटतें. तुझें काय मत आहे?

राधा०-(हास्यवदनानें) हें काय बाई बोलणं तरी! माझं मत आपल्या बाहेर कसं असणार! मला सुद्धां

किनई त्याला मुळींच नाव ठेवायला जागा दिसत नाहीं.

मा०—मला वाटतें त्याला बाहेर नोकरी देण्यापेक्षां घरांतच असों द्यावें आणि त्याचा इंग्रजी आभ्यास जास्त वाढविण्याची तजवीज करावी. त्याची बुद्धि चांगली असून त्या कामीं त्याची उत्सुकताही दिसते.

रा०—पण त्यापासून आपणास फायदा काय? परोपकाराकरितांच किंनाहीं हें करायचं?

मा०—तूं समजलीस नाहीं. तुला यापुढें तरी पुत्रप्राप्ती झाली तर ठीकच, नाहीं तर उपयोग होईल. आणि जरी झाली तरी आपल्या उपकाराचा तो कोणत्याही तऱ्हेनें उत्तीर्ण होणार नाहीं असें त्याच्या स्वभावावरून मला वाटत नाहीं.

रा०—पण बाई, आपल्या घरांत ऐन तारुण्याचे भरांत येत चाललेली सुस्वरूप मुलगी, तेव्हां अशा तरुणाला घरांत असूं देणं चांगलं किंवा वाईट याबद्दल माझे मनांत वारंवार विचार येतात. तशांत आपल्या बबीला त्याला दादा ह्मणायला सांगतें पण ती सटवी अगदीं ऐकत नाहीं आणि बहिणभावंडाच्या सलगीनं वागतही नाहीं.

मा०—अं: त्यांत काय आहे. तीं परस्पर तरूण असल्यामुळें असें होण्याचा संभव आहे. तीं परस्पराशीं सलगीनें न वागतील तितकें बरें. उभतांच्या समंजस

सुस्वभावावरून कोणत्याही वाईट प्रकारची भीति वागविण्याची जरूर नाहीं असें मला वाटतें.

रा०-तरी पण माझेकडून मी गैरसावध रहात नाहीं हो!

प्रवेश २ रा.

स्थळ-माधवरावाच्या घरांतील माडीवरील दिवाणखाना. (गोविंदा खुर्चिवर बसून टेबलावर कांहीं लिहित आहे तेथें हळूच बबी येऊन त्याचेजवळ डावे बाजूस उभी रहाते)

गो०-(तिचेकडे पाहून आश्चर्यानें) कां, काय काम आहे. कागद वगैरे कांहीं पाहिजे आहे काय?

ब०-(लाजत वांकड्या दृष्टीनें त्याचेकडे पहात हास्यमुखानें) हो, काम आहे. पाहिजे आहे पण कागद नाहीं.

गो०-(चकीत मुद्रेनें) तर मग काय पाहिजे आहे व काय काम आहे?

ब०-आई कासीला घेऊन देवदर्शनास गेली आहे. विठूला कांहीं निमित्त काढून बाहेर पाठविलं आहे. हा दरवाजा (बोटानें दाखवून) ही आंतून बंद केला आहे. आतां जास्त बोलण्याला अवकाश नाहीं आणि जास्त सांगण्याची जरूर पण नाहीं मला वाटतं! समजून वेड घेणं नको कांहो!!

गो०-(किंचीत् विचारकरून मनांत) वेड घेतलंच पाहिजे. (उघड) पण यांवरून मी खचीत कांहीं हीं समजलों नाहीं.

ब०—(मनांत) आतां काय करावं ? हो ठीक, असंच केलं पाहिजे ह्मणजे रुकार मिळण्यास उशीर लागणार नाहीं. (उघड) तें हातांतील पेन ठेवावं व खुर्ची अंमळ मागें घ्यावी. मला टेबलाचा खण उघडावयाचा आहे.

गो०-(हसून) हात्तिच्या. इतकेंचकां ? घ्यानां खणांतील पाहिजेतें (पेन टेवून खुर्ची मागें सारतो)

ब०—(एकदम त्याच्या डावे मांडीवर बसून गळयांत उजवा हात घालते) समजावं आतां कायतें. (पुढें बोलवत नसल्यामुळें स्तब्ध हाते)

गो०—(सर्वांगाला घाम सुटून चकीत होतो व कांहीं बोलवेना ह्मणून कांहीं वेळ स्तब्ध राहिल्यावर.) बरी बा-

ब०—(त्याच तोंडावर हात ठेवून बोलणे बंद करते) असं भलतंच बोलणं नको.

गो०-(तिच्या गळ्यावरील हात काढण्याचा व उठण्याचा प्रयत्न करतो) पहा, हें चांगलें नाहीं.

ब०—आपणास उठूं देणार नाहीं, आणि जबरदस्तीनं उठाल तर परिणाम चांगला होणार नाहीं. हें चांगलं नाहीं हें मी समजतें पण काय करूं ?

गो०—(मनांत) आतां जबरदस्ती उपयोगी नाहीं. युक्तीच लढविली पाहिजे. (उघड) तुह्मी समजदार अहां. हें कर्म इहलोकीं व परलोकीं उभय ठिकाणींही

किती वाईट परिणाम करणारें आहे तें तुह्माला सांगितलें पाहिजे असें नाहीं.

ब०—तें मी सर्व जाणतें व माझें मन आवरण्याविषयीं मी माझेकडून जितकं होतं तितकं केलं पण--(त्याच्या छातीवर डोकें ठेविते)

गो०—छेः छेः सूज्ञ मनुष्यास विचारानें मन आवरत नाहीं असें कधींच होणार नाहीं.

ब०-बरं पुरे झालं मेलं तें ब्रह्मज्ञान आतां. मी खरोखर सांगतें कीं, दुसऱ्या कोणाबद्दल मला अद्याप असं कधींच झालं नाहीं. काय असेल तें असो, आपणाला पाहिलं ह्मणजे माझ्या हृदयांत, किंबहुना सर्व देहांत, काय होतं तें मला सांगतां येत नाहीं. आपला व माझा काय ऋणानुबंध होता किंवा आहे कोण जाणं! लाज, मर्यादा, संकोच व नीति मला अखेर एका बाजूस ठेवावी लागली. काय करूं ?

गो०-वाः असें काय करावें. मनच असें करावें कीं, मी आपला वडील बं–

ब०—(त्याचे तोंडावर हात ठेऊन) पहाहो, असं भलतं सलतं बोलणं उपयोगी नाहीं. कांहीं असो, मला वाटतं कीं, आपणच माझ्या प्राणाचे आणि या देहाचेही खरे स्वामी आहां. माझा प्राण आपणास वांचविणें किंवा नाहीं ? (हास्यवदनानें त्याचे मुखाकडे पाहून मग नजर फिरविते)

गो०—(मनांत) आतां काय करावें ! (उघड) पण

हें काय ! आपण दरवाजा बंद करून आंत आहों हें किती धोक्याचें आहे? इतक्यांत विठू किंवा आई आल्या तर !

ब०–(देहभानावर आल्यासारखें करून) खरंच बाई. (त्याच्या छातीवरून डोकें उचलून सांवरून बसते.) पण मला निदान माझा अंगिकार केल्याचं वचन तरी यावेळीं पाहिजे, नाहीं तर मी सोडणार नाहीं. मग पाहिजे तें होओ.

गो०–(मनांत) आतांची वेळ तर टाळून द्यावी, नाहीं तर मोठें नुकसान होणार आहे. (उघड) बरें बुवा, तुह्मी ह्मणता तसें, अंगिकार केला, आतां झालें?

ब०–असं नाहीं. उद्यां रात्रीं आपल्या निजावयाच्या जागेच्या दरवाजाची आंतील कडी न लावण्याचं वचन द्यावं, ह्मणजे मी सर्व निजल्यावर येईन. (हात पुढें करते.)

गो०–(मनांत) कसेंही असो आतां ही वेळ टाळण्यास विलंब लावून उपयोगी नाहीं. (उघड) हें द्यावें वचन. (हातावर हात ठेवतो) झालें आतां?

ब०–(हांसत त्याच्या तोंडाकडे पाहून) नाहीं नाहीं आपलं वचन मनापासून आहेसं दिसत नाहीं आणि जर खरंच मनापासून असेल तर मला प्रीतीनं आलिंगन द्यावं ह्मणजे झालं.

गो०–(मनांत) चला, बहीण समजून एकवेळ असें

ही करण्यास हरकत नाहीं अशी मनाची समजूत केली पाहिजे. (उघड) बरें बुवा, तसें कां होईना. (डाव्या हातानें तिला कवटाळून धरून व उजव्या हातानें हनुवटीला हात लावून गालाचें चुंबन घेतो तेव्हां तल्लीन होऊन मनांत) आहाहा, किती तरी माधूर्य आहे यांत ! माझा देह आतां अगदीं थंडगार झाला. यावेळीं मी अमृतपानच केलें असें मला वाटतें ! असें सौख्य मला जन्मांतही कधीं झालें नव्हतें. नाटकांतील तें पोकळ दिखाऊ सौख्य आणि हें खरें सौख्य यांत किती तरी अंतर आहे ! ! (उघड) झालें आतां ?

ब०–(हास्यवदनानें त्याचे तोंडाकडे पाहते) मी जाऊं आतां ? पण वचनाची आठवण आहे ना ? (उठून उभी राहून जाऊं लागते)–

गो०–(उठून तिला पुनः दृढ आलिंगन देऊन चुंबन घेतो) हें वचन कधीं तरी विसरेन काय ? काय करूं, मला तुला सोडावेंसेंच वाटत नाहीं ! आतां मात्र खरो-खरच माझ्या दृढनिश्चयी नीतिची गाळण उडाली (पुनः चुंबन घेतो.)

ब०–हें काय बाई, पण खालीं कोणी आलबिलं तर !

गो०–(शुद्धिवर आल्यासारखें होऊन तिला सोडतो) हो हो, खरेंच, मी अगदींच या नागिणीच्या पाशांत तर्क रहीत गर्क झालों होतों. नाहीं नाहीं, आनंदसागरां-तच डुबकुळ्या देत होतों. (पुनः एकदा आलिंगून चुंबन घेतो)

ब०–कसंही असो आतां थांबून उपयोगी नाहीं.

मी येतें हो. (लौकर लौकर दरवाजाजवळ जाऊन व कडी उघडून निघून जाते.)

(गोविंदराव विचारांत निमग्न असून कांहीं सुचेनासा झालेला असा जाऊन खुर्चीवर स्तब्ध बसतो.)

गो०—(आपल्याशींच) काय करावें, कांहीं सुचत नाहीं ! एका पारड्यांत आईच्याप्रमाणें ज्यांनीं आश्रय दिला व पालन करीत आहेत त्यांचा विश्वासघात आणि व्यभिचाराद्भूत पातक व बेअब्रू, आणि दुसरे पारड्यांत वचन व त्या कोमलांगीचे, हरिणाक्षीचे, तारुण्यानें मुसमुसलेल्या सुंदर परीचे मनोभंग ! सूज्ञ पुरुषाला वचनभंगासारखें लाजीरवाणें दुसरें कांहींच नाहीं, शिवाय त्यामुळें तिच्या देहाचेंही नुकसान होण्याचा संभव दिसतो आणि दुसरीकडे पाहिल्यास विश्वासघात व व्यभिचार यासारखें मोठें पातक नाहीं. आतां काय करावें ! (विचार करून) आपण सध्यां येथून निघून जाऊन उद्यांची वेळ तर चुकवावी, मग पुढें काय होईल तें खरें. हो, हाच मार्ग उत्तम. असेंच करावयाचें.

प्रवेश ३ रा.

स्थळ—बबी उर्फ लक्ष्मीची निजावयाची खोली.

राधाबाई- (मोठ्यानें) बबी, बबी, (तिनें ओ दिल्यावर) अग, बाहेर उजाडलें तरी आहे किती तें पाहिलेंस कां डोळे उघडून ? आज तुला इतकी झोंप कशानें आली ?

ब०—(खोलीचा दरवाजा उघडून डोळे पुशीत) आई,

रात्रीं कीं नाहीं माझं डोकं दुखत होतं त्यामुळं सगळी रात्र झोंप आली नाहीं. ती पहांटेस जरा लागली.

रा०– तरीच तोंड बिंड इतकं उतरलं आहे! पण डागीनेंही अंगावरील नाहीं कां काढून ठेवले? (गळ्याकडे पाहून) तितका मोत्यांचा हारच कायतो काढून ठेंवलास वाटतं?

ब०–नाहीं. (छातीकडे पाहते व गळ्याभोंवती तपासते.) मी काढून ठेवला नाहीं. मला पक्कं आठवतं.

रा०–तर मग कोठें आहे?

ब०–(विचार करून) काल श्रावणी सोमवारची संध्याकाळीं आंघोळ करतानां तो खचित जाईच्या वेलीला अडकवून ठेवला होता, पण मग काढून घेण्यास विसरलें.

रा०–आणि हा वेळ पर्यंत त्याची तुला शुद्धीच नव्हती आं? सटवे, तुला काय ह्मणावं. चल आतां तरी कोठें ठेवला आहेस तो दाखीव. (घाई घाईनें दोघीही मागलेदारीं जाईच्या मंडपाखालील आंघोळीच्या शिळेजवळ येतात.)

ब०–(ठेवलेल्या जागेजवळ जाऊन बोटानें दाखविते.) ह्या येथें मी ठेवला होता असं मला पक्कं स्मरतं.

रा०–(रागानें) मग काय झाला? कोणी घेतल्या शिवाय कां जाईल? पण वेडे तूं इतकी कसी बे पर्वा? अशा मौल्यवान दागीन्याचे संबंधांनं तूं इतकी बेफाम

कशी राहिलीस? तुला आतां काय ह्मणावं? आणि आतां त्यांनां तरी काय सांगावं!

(मोलकरणीस बोलावितें)

रा०-काशी, ये काशी. (ती आल्यावर) कायग येथें (बोटानें दाखवितें) बबीनीं काल संध्याकाळीं तिचा मोत्यांचा हार ठेवला होता ह्मणून ती ह्मणते. तूं पाहिलास कां?

का०-नई बाईसाब, मासनी काई ठाव नई, आन म्या बगितल पननई.

रा०-पहा, खरं बोल, नाहीं तर हें प्रकरण पोलीसांत जाणार आहे.

का०- देवाच्यान्, बाईसाब. म्या बगीतलच नई.

रा०-(मनांत) आज किती वर्षं हीं मनुष्यें आमच्या येथें आहेत, अनेकवेळां त्यांस सांपडलेले मौल्यवान जिन्नस आमचेजवळ त्यांनीं आणून दिले आहेत, तेव्हां त्यांच्या हातीं हार खचीत लागला नसावा आणि लागता तर हीं मित्रीं मनुष्यें तो आणून दिल्याशिवाय रहातींनां. (उघड) विठू, अरे विठू, (त्यानें हाक दिल्यावर) इकडे ये पाहूं असा लौकर.

वि०-का बाईसाब, का हाये? (येतो.)

रा०-अरे, बबीनी त्या तेथें (बोटानें दाखविते) त्या वेलीला अडकवून तिचा मोत्यांचा हार काल संध्याकाळीं ठेवला होता तो तूं पाहिलास कां?

वि०-नई, बाईसाच, काल पून मी तकड गेलोंच नई बगा.

(इतक्यांत माधवराव हातांत एक लहानसा कागद घेऊन येतात)

मा०-कां, सर्वजण येथें मिळून काय चाललें आहे?

रा०-बत्री ह्मणते कीं, काल संध्याकाळीं स्नान करण्याचेवेळीं तिनें तिचा मोत्यांचा हार येथें (दाखवितें) आडकवून ठेवला होता आणि मग काढून घेण्यास विसरली. तो आतां येथें नाहीं व हीं दोघेंहा ह्मणतात कीं त्यांनीं तो पाहिला नाहीं.

मा०-(रागानें) मग गेला! बरें झालें! ही कारटी तशीच आहे. काय शुद्धींत बिद्धींत होती कीं नाहीं? हिचें ध्यान कोणीकडे होतें?

(बत्री रडूं लागते.)

रा०-(तिला पोटाशीं धरून) उगी बाई, उगी रहा. असल्या जिनसाबद्दल फार काळजी ठेवावी. आतां तूं लहान कां आहेस? (तिचे डोळे पुसते व माधवरावास) आतां होऊनगेलेल्या गोष्टीबद्दल मुलीस बोलून काय उपयोग! मनुष्य मेलं एखादवेळ विसरतंच आहे!! पुढें तपास मात्र केला पाहिजे हें खरं.

मा०-(शांत होऊन) हां, आतां समजलों; पहा मी आतां हार बाहेर काढतों. हें पत्र पहा. आपले विश्वासू गोविंदराव! हें पत्र मला टेबलावर सकाळींच माडीवर गेल्याबरोबर मिळालें.

रा-०त्यांत काय लिहिलें आहे?

मा-०यांत तो ह्मणतो कीं "मी कांहीं फार जरूरीच्या कामाकरितां उज्जनीस गेलों आहे. प्राक्तनी असेल तर परत भेट होईल. विचारल्याशिवाय गेल्याबद्दल क्षमा व्हावी."

रा०-अग बाई, हें काय! हार तर घेऊन नाहींना पळाले?

मा-०दुसरें काय तर. मी आतां हार बाहेर काढतों. त्यांच्या प्राक्तनी परत भेट आहेच! जातो कोठें!

ब-०(मनांत) असं चोरीचं काम ते करतील हें मुळींच संभवत नाहीं. खरोखर ते गेले माझ्या त्रासाकरतां आणि ह्मणूनच कालरात्रीं त्यांची खोली मला रिकामी आढळली. कसंही असो, पण ही गोष्ट बाहेर तर बोलतां येत नाहीं. देवा, गणपतीराया, ते सुखरूप असोत; त्यांनां कांहीं दुःख होऊं देऊं नये आणि मला लौकर भेटण्याची त्यांस बुद्धी द्यावी (सद्गदीत होते.)

रा०-काय बाई सांगावं. आजकाल कोणावर उपकार करून व भरंवसा ठेऊन उपयोग नाहीं.

ब०--पण आई, त्यांनां इकडे येण्याचं कांहीं कारणच नव्हतं.

मा०-(रागानें) बस्स, बोलूं नको. तुला यांत कांहीं समजत नाहीं.

रा०-बाई आपली पाठ आपल्याला दिसते कां आहे!

प्रवेश ४ था

स्थळ-माधवरावाचा दिवाणखाना.

फौजदार येतो.

मा०-आवो, फौजदारसाहेब. आपकूं आज तसदी देना पडी है.

फौ०-क्यं, क्या हुवा रावसाहेब?

मा०-कल संजाकूं हमारे लडकीनें न्हाती वखत गलेमेसें मोतीका हार निकालके बाजूके झाडमें लटका दियाथा और ओ पिछे निकालनेका भूलगई. ओ कोईनें उठालिया. हमारे घरमे एक बमनका लडका उनवीस बरसके उमरका उज्जनकूं बिगरपुछेसें गयेरात निकल गया है, और ओही हार ले गया ऐसा हंकूं शक आता है, करके उसकूं तावडतोब पकडनेकी तजबीज होनाचहिये.

फौ०-रावसाहब, आपनी लडकी केतने उमरकी है और ओ के लडकी निसानी क्या है? उसकुं पछानग कैसे?

मा०--लडकी पंधरा बरसकी है. लडका खूपसुरत है, रंग भूरा है. कोट सफेत पेनता है. धोती और दुपट्टा रेशमकोरका है. शिरमे जरके किनारका फेटा डालता है. ठिंगणा नही और बोहोत उचाभी नहीं.

फौ०-ठीक है. आब हं उसका तावडतोब तजबीज करतें है. आप कुछ फिकर करना नहीं.

अंक ५ वा.

प्रवेश १ ला.

स्थळ-मुंबई येथील कृष्णरावाचें घर.

कृ०--ऐकलेंस कां, विश्वनाथपंताकडून पत्र आलें आहे. त्यांत आपली सरस्वती गरोदर असून येत्या पंचमीस ह्मणजे आजपासून सोळावे दिवशीं ओटी भरणें करण्याचें ठरविलें आहे. ह्मणून आपण उभयतां त्यावेळीं असावें अशी त्यांची इच्छा आहे. पत्रांत दुसरी पण एक आनंदाची गोष्ट लिहिली आहे कीं विश्वनाथपंताला खुद्द इंदुरासच न्यायाधिशाची जागा मिळाली आहे. याच पाकिटांत हें दुसरें पत्र आपल्या सरस्वतीचें आहे. त्यांत मुख्य मजकूर आपण जरूर यावें असें आग्रहपूर्वक लिहिलें आहे हाच आहे. मात्र यावेळीं (हसून) सही नेहमीप्रमाणें नुसती सरस्वती नसून "सरस्वती ऊर्फ गिरिजाबाई" अशी आहे.

रुक्माबाई०(हसून) अबब, केव्हढी बाइ ह्मणून घेण्याची हौस ही ! ह्मणजे सासरचं नांव तिला इतकं आवडतं ह्मणून दाखविते आहे वाटतं ! ! कीं आतां न्यायाधिशीणबाई झाल्या ह्मणून अशी सही केली आहे?

कृ०—न्यायाधिशीणबाई झाल्या त्याबद्दल अभिमान वाटणें स्वाभाविक आहे. तो आपल्याला तिनें बुध्या दाखविला आहे असें नाहीं, परंतु स्वाभाविकपणें तो

बाहेर निघाल्याशिवाय रहात नाहीं असा मनुष्यस्वभावांतच गुण आहे. अस्तु. पण यापासून आपणाला आनंदच आहे.

रु०—तें असो, पण वेळेवर पोहचणं ह्मणजे आपल्याला निघण्यास आतां विलंब करतां उपयोगी नाहीं.

कृ०—हो, आणि शास्त्रीबुवा व गंगाबाईला पण बरोबर न्यावें असें मला वाटतें.

रु०—माझेंहि मत असेंच आहे. तीं उभयतांही आपल्या मर्जीबाहेर वागणारीं नाहींत.

कृ०—बरें तर मी शास्त्रीबुवांना विचारितों. व तूं गंगावहिनीला विचार ह्मणजे झालें. मी आजच आफिसांत गेलों ह्मणजे एक महिन्याची रजा घेतों.

प्रवेश २ रा.

स्थल—मुंबईंतील शंकरशास्त्र्यांचें बिऱ्हाड.

शं०—काय करावें मुलाचा पत्ता नाहीं तो नाहीं, पण त्याच्या सासरच्या मनुष्यांबद्दलही आज इतकीं वर्षें झालीं कांहीं कळत नाहीं. मला कृष्णरावाच्या जांवयाच्या मार्फत त्यांचा तपास करण्याचेंही सुचलें नाहीं. यावरून कर्माचे जसे योगायोग तशी बुद्धी !

गं०—काय सांगावं, सुनेचं नाव हौसेनं लक्ष्मी ठेवलं पण तिच्या पायगुणानं तर सर्वच नाश झाला !

शं०—यांत पायगुण कशाचा. हा कर्माचा ह्मणजे

ग्रहदशेचा प्रताप आहे. तें असो, पण काल कृष्णराव मला ह्मणत होते कीं इंदुरास त्यांचे जावयांनीं बाय-कोच्या ओटी भरण्याकरितां त्यांना बोलाविलें असून ते उद्यां जाण्यास निघणार आहेत. त्यांची इच्छा आहे कीं आपण उभयतांनींही त्यांचे बरोबर जावें.

गं०—मग आपल्याला जाण्याला कांहीं हरकत आहे असं नाहींच. आपणाला कांहीं कुणाची रजा बिजा घेतली पाहिजे असं थोडंच आहे !

शं०—मी त्याप्रमाणें त्यांना सांगितलेंच. यांत आणखी एक विचाराची गोष्ट आहे.

गं०—दुसरा काय विचार आणखी ?

शं०—जर कदाचित् माधवरावाची बदली इंदुरास होऊन ते तिकडे गेले असतील तर कदाचित् भेटण्याचा किंवा त्यांचा शोध लागण्याचा संभव आहे.

गं०—हो, मला तर असंच वाटतं कीं, त्यांनीं आपल्याला वेळेवर कळविल्याशिवाय ते तिकडे निघून गेले असतील व आपण इकडे निघून आल्याचं त्यांस ठाऊक नाहीं. यामुळंच परस्परांचीं पत्रं एकमेकांस न पोंचल्यामुळं आपला समाचार त्यांना कळत नाहीं व त्यांचा आपल्याला कळत नाहीं.

शं०—खरेंच असें होण्याचा संभव आहे व असेंच झालें असावें. तूं कल्पना पण ठीक केलीस.

प्रवेश ३ रा.

स्थळ—इंदूर येथील विश्वनाथपंताचें घर.

(सकाळचे जेवणानंतर तिघेही पानसुपारी खात दिवाण-खान्यांत खुर्च्यांवर बसून बोलतात)

विश्वनथापंत०—आपल्यास खंडव्यापासून इकडे येण्यालाच कायतो जास्त त्रास पडला असेल!

शंकरशास्त्री—काय करावयाचें, त्याला काय उपाय आहे?

कृष्णराव—पण थोड्याच काळांत रेल्वे तयार झाल्यावर सर्व त्रास चुकणार आहे.

शं०—रेल्वेनें त्रासही चुकतो आणि जोखमही तितकेंच आहे. जर कां एखादा अपघात विपघात झाला तर मरलीं शंभर वर्षे! शिवाय आंत बसलेलें असेल तों पर्यंत ती एक कैदच!

वि०—नुकसान होणें असेल तर तें कोठेंही असलें तरी व्हावयाचें. शिवाय रेल्वे संबंधी अपघात न होण्याविषयीं फार जपण्यांत येतच असतें, ह्मणजे सर्व व्यवस्था काळजीपूर्वक व व्यवस्थित ठेवली जाते.

कृ०—आणि पायरस्त्यानें काय थोडे धोके आहेत! चोरांचे भिती शिवाय चालण्याचे श्रम किंवा गाड्यांतील धक्के बुक्के! तसेंच बैलगाड्याही उलथ्या पालथ्या होण्याचा किंवा मोडण्याचा संभव नसतो असें नाहीं.

खंडण्याचे रस्त्यावर कित्येक ठिकाणीं रानटी हिंसक जनावरांचीही भीती आहे.

वि०—(घडयाळाकडे पाहून) कोर्टांत जाण्याची वेळ होत आली. आहे कां मनांत कोर्ट पाहण्यास यावयाचें? आज एका दक्षणी खटल्याचा बहुधा निकाल व्हावयाचा आहे.

शं०— दक्षणी खटल्याचा ह्मणजे काय?

वि०—ह्मणजे पक्षकार दक्षणी आहेत.

कृ०—गुन्हा काय आहे?

वि०—एका दक्षणी ब्राह्मण जातीच्या मुलानें चोरी केल्याचा त्याचेवर आरोप आहे.

शं०—चलावें कृष्णराव, बसून तरी येथें काय करावयाचें आहे?

कृ०—चला बापडे, माझेकडून कांहीं ना नाहीं. पण कालच संध्याकाळीं आपण दमून आलेले!

शं०—हातूत्याच्या, त्यांत काय आहे? अमळ बसून मग परत येऊं पाहिजे तर.

(इतक्यांत गाडीवाला येऊन गाडी तयार आहे. ह्मणून सांगतो व तिघेही खालीं उतरून जाऊन गाडींत बसतात.)

अंक ६ वा.

प्रवेश १ ला.

स्थळ--न्यायकोर्ट.

(सर्व साक्षी, पक्षकार, न्यायाधीश वगैरे असून, अरोपिताची जबानी सुरूं होते.)

विश्वनाथपंत न्यायाधीश–तुमचें नांव काय ?

कैदी–माझें खरें नांव नारायण.

न्या०–आणि बापाचें नांव ?

कै०–शंकरशास्त्री.

(हें ऐकून न्यायाधीश, शंकरशास्त्री, कृष्णराव, माधवराव आणि चिकाच्या पडद्याचे आड बसलेल्या राधाबाई व बबी उर्फ लक्ष्मी फारच चकीत होतात.)

न्या०–आपलें रहाणें कोठलें ?

कै०–र-र-त्ना गि-गि-री-(मूर्छना येऊन खालीं पडतो व तोंडाला फेस येतो.)

(सर्व त्याचेजवळ धांवत येतात आणि लक्ष्मी मोठ्यानें रडूं लागते.)

न्या०- यानां फेंपरें येण्याची सवय आहे वाटतें !

पोलीस शिपाई–कौन जाने सरकार, लेकीन कैदखानेमेंसें अभी हं उसकूं इधर ले आवने लगे जद उनें हंकूं कहाके अंधारेमें ओपडारहाथा जद कोई जानवरनें उसकूं काटके भाग गया. हं ओ बात झुटी समजे करके जाहर नहीं किया.

न्या०–कोनहै? नाईक, जलदी जाके डाक्टर-साहबकुं बुलाके ले आवना.

नाईक–बोहोत अछा सरकार. (दौडत निघून जातो)

(कोणी कैदीस उचलण्याचा प्रयत्न करतात, कोणी तोंडांत पाणी घालतात, शाम्रावुवा, लक्ष्मी वगैरे स्फुंदस्फुंदून रडतात व कोणी त्यांस समजवूं लागतात इतक्यांत डाक्टर येतो.)

डा०–हटो. अब सब लोक जरा बाजू होजाना. (सर्व बाजूंस झाल्यावर त्याला तपासून) च्: च्: च्:, इसका प्राण तो निकल गया है. आब इसकूं कुछभी इलाज करके फायदा नाहीं. इसकूं सर्पदंश हुवाहै.

(इतक्यांत एक मनुष्य येऊन न्यायाधिशास)

वीरचंद–(मोठ्यानें) जो शाहेब. मारा पेहेला सुनो. (सर्व चूप राहून त्याचेकडे पहातात) हुं, रावशाब, माधवराव इंजनरना पडोसमे रहता हूं. फकत बे चार-मकान बिचमे है. हु बहारगांम गयाथा, अभी आया त्यारे माराधणीयानीनें हंकू ने मोतीका हार दिया (खिशांतून काढून दाखवितो) अने बोला, गया सोमवारकूं सांजरे कठ्येनें ओ मारावाडामा लाया, और हमारा धणीयानीनें उसकूं हाकाला त्यारे ते छोडके भाग गया.

न्या०–(माधवरावास) रावसाहेब, पहावा तो हार आपलाच आहे काय?

मा०–(हातांत घेऊन पाहून) हो हा आमचाच आहे.

न्या०--(वीरचंदास) तमे अगर तमारा बायडीये आवात पेहेलीच जाहेर केमनथी किधी? तमोने हिंदी-बरावर ना आवडतूं होय तो गुजरातीमां केओ.

वी०—सरकार मारावहूये तेनाबाबद फर्याद थई छे अनेकई गडबड चाले छे एम सामळ्यूं हतूं, पण आपणे कई केवा जशो तो तुच ते चोरी किधी हशे एम कोई कही वखते आमथी तसदी आपशे, एम समजी भीई ने तेने आ वात कोई पासे किधी नथी. हूं अवताच वार मने किधूं. हुं आ वात सामळी अने आजे ते खटलो कोरटमा चाले छे एम खबर पडवाथीं बिचारा केदीनें आमथु दुःख थशे एम जाणी ताबडतोब हारलई दोडीनें अही आयवो.

न्या०—वाः, शाबास, तमे म्होटूं काम किधूं. तमे खरा प्रामाणिक छो. बहारगांमथी थाकीने आयवा छतां बिजानु दुःखजाणी ते मटाडवा शारूं दोडीनें अहीं आयवा, येथी केदीपरनो वहेम उडी गयोछे.

माधव०—मी या भल्या मनुष्यास वीस रुपये इनाम देईन.

न्या०—अस्तु. मला वाटतें जातां कोर्टाचें काम बंद ठेवावें.(माधवरावादिकांस) आतां हें प्रेत उचलून आपले बिऱ्हाडीं घेऊन गेलें पाहिजे. (सर्वांची मुलाच्या निरपराधीपणा विषयीं खात्री होऊन फारच हळहळतात व प्रेत उचलून नेल्यावर सर्व कोर्टातून निघून जातात.)

प्रवेश २ रा.

स्थळ-विश्वनाथपंत न्यायाधिशाचें घर.

(नारायणाचे प्रेताजवळ लक्ष्मी (बर्वा), तिची सासू, आई व इतर बायका बसल्या आहेत व पलीकडे थोड्या अंतरावर माधवराव व शंकरशास्त्री, आणि कृष्णराव बसले आहेत)

शंकर०-(माधवरावास) पण इतके महिने आपल्या कडे असतां आपल्याला कसें ओळखलें नाहीं ?

मा०-अहो लहानपणीं दोन तीन वेळां पाहिलेलें व दरम्यान किती वर्षें तरी नजरेआड झालेले! पण एक मात्र माझ्या बुद्धीभ्रंशाची गोष्ट खरी कीं, जो चोरी करून पळेल तो आपलें खरें ठिकाण कळविणार नाहीं आणि यांनीं तर उज्जनीस गेल्याचें पत्रांत लिहिलें त्याप्रमाणें उज्जनीसच ते सांपडले, ही विचार करण्या-सारखी गोष्ट होती.

शं०-(डोळ्यांतून अश्रू पडूं लागतात ते पुसून) पण असें न कळवितां निघून जाण्याचें कारण तरी काय असावें ?

कृ०-मलाही तेंच गूढ पडलें आहे.

मा०-माझा त्या संबंधांत कांहीं तर्क चालत नाहीं.

गंगाबाई-माझा बाळा तें आतां उठून थोडाच सांगणार आहे ! (रडूं लागते) काय माझ्या पदरीं असं महतपाप होतं कीं माझी जिवंत भेटच झाली नाहीं ! (कपाळावर हात मारते व मोठ्यानें हंबरडा फोडते)

रुकमाबाई-असं काय हें गंगाबाई ! जसे योगायोग

असतात तसं घडून येतं. शिवाय आतां शोक करून होऊन गेलेली गोष्ट परत कां येणार आहे?

राधाबाई–परत तर येत नाहीं. पण बाई, एकएक आठवतें ना! काय बाई गुण तरी सांगावे! बोलणं किती गोड व मर्यादशीळ, विश्वासूपणा तरी किती, मला आई आई ह्मणून ह्मणायचं, कदाचित रागावलें तरी परत उत्तर करायचं नाहीं! काय काय ह्मणून आठवावं! मला तर आमच्या मुलाप्रमाणेंच वाटत होते आणि आमचा विचारही त्यांना दूर करण्याचा मुळींच नव्हता. पण कर्म! (रडूं लागते.)

सरस्वती (गिरजाबाई)–आपण अशा मायाळु-पणांनीं वागवीत होतां व कुमार्गवर्तीही नव्हते मग त्यांस न कळवितां निघून जाण्याचं कारण काय झालं असावं? (इतक्यांत आंतल्याआंत रडत बसलेली लक्ष्मी उठून बाहेर जाऊं लागते.)

रा०– बबे, आग कुणीकडे चाललीस?

ल०- बाहेर.

रा०–आहो कोणी तरी तिच्याबरोबर जाबरं. (गिरजाबाई बरोबर जाते.)

गि०–(मोठ्यानें ओरडून)आहो धांवा हो धांवा. धांवा लौकर (सर्व मागील बाजूस धांवत जातात आणि पहातात तों मागील आवारांतील विहिरीजवळ लक्ष्मीच्या कमरेस गिरजाबाईनें मिठी मारली आहे व लक्ष्मी ती सोडविण्याची खटपट करीत आहे.)

लक्ष्मी०—मला सोडाहो. मीच कर्मचांडाळीण, मीच राक्षसीण, मीच माझ्या कपाळचं सौभाग्यकुंकुम भक्षण केलं? मला आतां जगायचं नाहीं. (दोघी तिघी तिला धरून परत आणूं लागतात)

रा०—बबे, काय वेडीं झालीस का? असं काय करतेस?

ल—०मी वेडीच झालें होतें व आतां ही झालेंच आहे? माझे प्राण आतां रहायचे नाहींत. एक जिवाचे दोन भाग होतात कां?

(तिला घरांत आणतात व ती जमिनीवर पडूं लागते तेव्हां गिरिजाबाई तिला आपल्या अंगावर सांवरून बसविते.)

गि०—लक्ष्मीबाई, दुःखाचेवेळीं मन कठोर केलं पाहिजे, विवेक केला पाहिजे. झालेलं कां आतां परत येतं!

ल०—तें मला सर्व समजतं. पण मीच चांडाळीण या सर्व अनर्थास कारण आहे. (कपाळावर हात मारते व गिरिजाबाई तिचा हात धरते) मीच माझा अमृतघट फोडून टाकला. मी जिवंत राहिल्यास माझा अभागिणीचा आणि पापिणीचा पृथ्वीला भार होणार आहे. जोतीला सोडून प्रकाश दूर राहूं शकतो तरी! माझ्या पापिणीच्या त्रासाकरतां आणि त्या मेल्या सन्मार्गाकरितां सत्वस्थानीं देह अर्पण केला!! (रडूं लागते.)

गि०—उमाबाई. (तिचे डोळे पुसते) आपलं बोलणं मला किं नाहीं बाई, कांहींच उमगत नाहीं. तुमचा अपराध तो कसला?

ल०-मीच अपराधीण, मीच चांडाळीण, मीच

मनुष्यभक्षक ! माझी पुरी खात्री झाली, ह्मणूनच जाणं झालं, ह्मणूनच हा अनर्थ झाला, (डोळे मिटून आंमळ थांबून) आहो, एकटे जाऊं नका, ही मी आलें पहा; रागावले असाल तर मी आपल्या चरणावर लोळतें, क्षमा मागतें ! वचन देऊन असे फसवून कसे जातां ! पुरुष प्रकृतीची जोडी जन्मांतरी तरी फुटते कां ! !

गंगाबा०–अहो, ही अशी काय बडबडते ! वायू-बियूचा झटका तर नाहींना ! (सर्व जवळ येतात.)

राधाबा०–(तिला आपले अंगावर पुढ्यांत घेऊन डोळ्यांला पाणी लावते) बबी, बाई, असं काय करतेस, आमचेकडे पहा. (रडूं लागते.)

ल०–(बेशुद्धींत) नाहीं, मी आतां मुळींच सोडायची नाहीं. माझ्यामुळेंच तुह्मांला दुःख झालं.

मा०–(तिला आपले अंगावर घेऊन डोळ्यांला पाणी लावतो व कानांजवळ ओरड्यानें) बबे, बबे, हें पहा.

ल०–(डोळे उघडते) आतां सर्वांनीं माझेवर कृपा ठेवावी.

मा०–बबे, मी कोण, माझेकडे पहा, असें काय करतेस ?

ल०–(त्याच्या तोंडाकडे पाहून) बाबा, काय करूं ? (रडूं लागते.)

(इतक्यांत विश्वनाथपंत व त्याचे बरोबर दुसरे दोघे तिघे आंत येतात.)

चि०–चला आतां, सर्व तयारी आहे, मंडळीही

आली आहे, आतां स्नान घातलें पाहिजे. (रितीप्रमाणें प्रेत उचलून बाहेर नेऊन त्यास स्नान वगैरे घालून तिरडीवर ठेवतात व बांधूं लागतात आणि स्त्रियांचा रडण्याचा एकच गोंधळ होतो.)

ल०—(धांवत जाऊन तिरडीवरील प्रेतास कवटाळून धरते) या मलाही शेजारी बांधून न्या, मी सहगमन करणार, मला हें जग आतां शून्यवत आहे, मी मुळींच मागें राहणार नाहीं.

(सर्वांचीं अंतःकरणें सद्गदीत होतात व कोणी तिची मिठी सोडवूं लागतात. इतक्यांत गंगाबाईही हंबरडा फोडीत येते.)

साधू०—(पुढील दरवाजांतून कंपाऊंडांत प्रेताजवळ येऊन) काय हो, आहे काय? मागें सरा पाहूं.

(सर्व त्यास पाहून चकित होतात व माधवराव त्यास ओळखून, जाऊन त्यांचे पाय धरतात.)

साधू०—उठा, उठा, रावसाहेब. काय आहे तें सांगातर खरें.

मा०—हे माझे जामात सर्पदंश होऊन मरण पावले आहेत.

सा०—(लक्ष्मीस) ऊठ बाई, बाजूला हो पाहूं.

ल०—नाहीं नाहीं, मी सोडायची नाहीं, मी बरोबर जाणार.

स्वामी०—हो हो, पण प्रेत मी नेऊं देत नाहीं. भिऊं नको. इकडे माझेकडे तर पहा. मी कोण आहे तें.

ल-०(पाहून) महाराज, आपण! बरं झालं आप—

(पुढें बोलवेना. त्यांचे पाय धरते व रडूं लागते.)

स्वा०–मुली, उठ. आमळ पलीकडे हो पाहूं. तूं भावेंकरून केलेल्या गणेशाच्या वृताचरणामुळें तो मंगलमूर्ती संतुष्ट आहे. (ती बाजूस होऊन खालीं पहात उभी रहाते.) सोडा पाहूं या दोऱ्या आणि प्रेताला मोकळें करा. (तसें केल्यावर) आणा, थोडेसें स्वच्छ पाणी आणा. (सर्व तटस्थ होऊन पहातात व एका पंचपात्रांत पाणी आणून देतात.)

स्वा०–(सर्वांस) पहा आतां त्या श्री सिद्धीदाता गणपतीचें, संकट निवारकाचें, कलियुगांतील परमेश्वराचें आणि निश्चयात्मक भावभक्तीचें सामर्थ्य.

(थोडें पाणी ओंजळींत घेतो आणि ह्मणतो.)

श्लोक (वसंत.)

जो आद्य दैवत गजानन तेजराशी ।
बाधूं न दे कधिंच संकट तो जराशी ॥
भावें तया नमुनि मागत सिद्धिदोदा ।
धांवे त्वरें निरसि संकट सर्व खेदा ॥

(पाणी प्रेताचे मुखांत घालतो, प्रेत जिवंत होऊन नारायण तत्काळ उठून बसतो, **स्वामी** तत्क्षणीं अदृश्य होतात व सर्वजण चकीत आणि उल्हास परिपूरीत होतात.)

समाप्त.